# प्रकरण ५ वे

# उपसंहार

पृष्ठ क्र. १६८ ते १७३

# प्रकरण ५ वे

# उपसंहार

आतापर्यंत 'सानियांचे व्यक्तिमत्व व साहित्य', 'खिडक्या' व 'दिशा घराच्या' या कथासंग्रहांचा परिचय व विशेष, सानियांच्या कथांचे स्वरुप व वाड्.मयीन विशेष या प्रकरणांचा अभ्यास केल्यानंतर मला असे जाणवले की, 'सानियांचे व्यक्तिमत्व व साहित्य' या पहिल्या प्रकरणात सानिया यांचा जन्म, त्यांचे शिक्षण, त्यांची प्रकाशित पुस्तके, त्यांना मिळालेले पुरस्कार व त्यांचे वाड्.मय यांचा आढावा घेतलेला आहे.

सानिया या स्त्रीकथाकार म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या लेखनाचा आवाका खूप मोठा आहे. उच्चभ्रू स्त्रियांची दु:खे त्यांनी बारकाईने टिपलेली आहेत. त्यांचा पहिला कथा-संग्रह 'शोध' १९८० मध्ये प्रसिद्ध झाला. जवळपास सगळयाच कथा-कादंबऱ्यातील त्यांची पात्रे स्वत:शीच संवाद साधताना (स्वगते) जास्तीत जास्त दिसून येतात.

स्त्रीमनाच्या विविध दु:खाचे पदर त्यांनी आपल्या कथेतून उलगडून दाखवले आहेत. मानवी नात्यांचा शोध हे त्यांच्या लेखनाचे सूत्र आहे. त्यांचे एकूण लेखन नायिकाप्रधान आहे. मानवी नात्यांचा शोध त्यांच्या लेखनाला प्रवृत्त करतो असे त्यांचे म्हणणे आहे. सानियांच्या कथेत भेटणाऱ्या स्त्रिया या स्वत: विचार करणाऱ्या, स्वत:चा शोध घेणाऱ्या, स्वातंत्र्याची आस असणाऱ्या आहेत. अशा स्त्रियांचे नवरे अतिशय बुद्धिमान, समजूतदार व संवेदनशील असतात.

त्यांच्या कथेमधून स्त्रीलासुद्धा एक माणूस म्हणून समाजाने किंमत द्यायला हवी. असे त्यांच्या कथा वाचून लक्षात येते. 'स्त्री' ला केंद्रबिंदू ठेवून लिहिलेल्या त्यांच्या सर्वच कथा वाचकाला विचार करायला प्रवृत्त करतात. एका विशिष्ट ध्येयासाठी झपाटणाऱ्या नायिका त्यांच्या सर्वच कथेतून दिसतात.

'खिडक्या' या कथासंग्रहात दोन कथांचा अपवाद सोडल्यास सर्वच कथा स्त्री-प्रधान कथा आहेत. 'एकदा जाग आली' कथेत स्वत:च्या अंगातील कलेची धग विझली म्हणून निराश कालिंदी भेटते, वडिलांची परवानगी नसताना चारुहासबरोबर लग्न केल्यामुळे,लग्नाला दहा वर्षे होऊनही वडिलांचे तोंड न पाहणारी किशोरी या नायिका

स्वत:लाच त्रास करुन घेतात. 'वाटा' व 'पावसाळयातील दिवस' मधील अनुक्रमे मिनू व मोनिका यांना आपल्या नवऱ्याच्या मोठेपणाचा साक्षात्कार होतो. त्यामुळे त्यांना सुधारण्याची संधी त्यांचे नवरे त्यांना देतात. आपल्या बहिणीचे लग्न मोडू नये म्हणून झुरणारी अश्विनी (वय) तर आपल्या वडिलांचे दुसरे घर आहे या विचाराने व्यथित होणारी साधना (दुसरं घर) या नायिका आपल्याला दिसून येतात.

आपली मैत्रीण आजारी असताना आपण मदत करु शकलो नाही आणि आपल्या मित्रावर आपले प्रेम आहे हे वेळीच न सांगितल्यामुळे रडणारी 'शिल्लक' कथेची नायिका 'मी', तर आजुबाजूची परिस्थिती आणि आपल्या नवऱ्याला समजून घेण्याची एक संधी मिळाली असे म्हणणारी 'दुहेरी' ची नायिका 'मी' या स्वत:लाच दोष देतात.

'खिडक्या' कथेतील सुमा आपल्या लेखक वडिलांचे सर्व अप्रकाशित लेखन जाळणार असते कारण तिच्या वडिलांनी तिला लहानपणी कधी जवळ येऊनच दिलेले नसते. आणि आता त्यांच्या मृत्यूने सर्वच संपलेले असते. 'संदर्भ' या कथेतील कावेरी प्रेमसंबंधातील पुढचे टप्पे घसरणीचे आहेत म्हणून गृहीत धरते आणि बंद करुन टाकते. आयुष्यात स्वत:च्या बळावर सर्व मिळवलेली पद्मिनी एका बाजूने येणारा वडिलांचा दबाव, पिऊन वाया गेलेला नवरा, तिच्या कामामुळे तिच्यावर येणारा दबाव यामध्ये तिची होणारी कोंडी यांचे अतिशय सरसपणे चित्रण उतरले आहे.

या कथासंग्रहात सानियांनी स्त्रियांचे विविध अनुभव, दु:खे चित्रित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या कथेत स्त्रियांच्या विविध नात्यातून निर्माण झालेले पेच इतके सूक्ष्म आणि तीव्र असतात की ते सुटण्याची शक्यताच दिसत नाही.

या कथासंग्रहात सानियांच्या कथेतील सगळयांनाच आपल्या भोवतीच्या माणसांना समजून घेण्याची आस आहे. आपोआप गृहीत धरली जाणारी आणि आयुष्यात नंतर बांधली गेलेली अशी नाती नक्की काय देतात आणि घेतात हे जाणण्याची उत्कट इच्छा आहे. इंग्रजी मिश्रीत मराठी भाषेचे वेगळे रुप त्यांच्या कथेचे खास वैशिष्टय म्हणता येईल. स्त्रियांना बरोबरीने वागणूक देणारे पुरुष अतिशय संवेदनशील व उच्च वर्गातील दाखवले आहेत. व्यक्तिरेखेचे एवढे जबरदस्त वर्णन करतात की ती व्यक्ती जशीच्या तशी डोळया समोर उभी राहते.

स्त्रीवाद हा सानियांच्या लेखनाचा मुख्य गाभा आहे. स्त्री रुपाचे कसून शोध घेणारी, शरीर अनुभवाचे मनावर होणारे ढोबळ व सूक्ष्म परिणाम तपासणारी, स्त्रियांच्या व पुरुषांच्या साहित्यातील प्रतिमांमधून कळत नकळत दिसणाऱ्या मानसिकतेचा उलगडा करू पाहणारी व महत्वाचे म्हणजे प्रस्थापित व आदर्श मानल्या जाणाऱ्या साहित्याचा नव्या निकषावर पुनर्विचार करणारी अशी सानियांची कथा आहे.

कथेतील वातावरणनिर्मितीमुळे आणि निसर्गचित्रणामुळे कथा अधिकच खुललेली आहे. निवेदनशैलीच्या पातळीमुळे कथेचा वाचकांवर चांगलाच परिणाम होतो. कधी छोटया छोटया अर्थपूर्ण शब्दांनी तर कधी वाक्यांनी संवाद अधिक बोलके वाटतात.

सानिया यांच्या 'खिडक्या कथासंग्रहाचा परिचय व विशेष' या दुसऱ्या प्रकरणा- मध्ये त्यांच्या कथांचा थोडक्यात सारांश व त्यांचे विशेष नोदवले आहेत.

'दिशा घराच्या' हा सानियांचा दीर्घ कथासंग्रह आहे. यामध्ये फक्त चारच कथा आहेत. सानियांचा जास्तीत जास्त कल दीर्घ लेखनाकडे दिसून येतो. त्यांच्या कथांमधील स्त्रीपात्रे शरण जाणारी नाहीत. पण त्यांच्या वाटयाला जेव्हा एकाकी अवस्था येते, मानसिक कोंडमारा जाणवू लागतो तेव्हा त्यांना कोणाचा तरी आधार महत्वाचा वाटतो. पण त्या आत्महत्या वगैरे करत नाहीत. कारण काही केले तरी त्यांना जगणे महत्वाचे वाटते. 'त्यानंतर...' कथेत ज्या नवऱ्याबरोबर राधिकाने सोळा वर्षे संसार केला असतो तो अचानकपणे एके दिवशी तिला सांगतो की तो तिला सोडून जाणार आहे. राधिकाला कळत नाही की हा प्रसंग ती एवढे शांतपणे कसे काय घेऊ शकते. तो दीडवर्षांनी घरी परत येतो तेव्हा पुलाखालचं बरच पाणी वाहून गेलेले असते. पण राधिकाच परत एकत्र राहाण्यासाठी तयार होते. जी एक आंतरिक भावना असते, समजून घेण्याचे जे काही नाते असते ते सानियांच्या नायिकेजवळ आहे. एकटे राहण्याचे बळ त्यांच्या जवळ आहे. पण तरीही त्यांना पुरूषांचा आधार महत्वाचा वाटतो. या दीड वर्षात राधिकाला आलेले अनुभव, तिला झालेला त्रास, तिची होणारी शारिरीक आणि मानसिक कोंडी, इतरांनी तिला सुचवलेले पर्याय या सर्वांचे चित्रण सानियांनी आपल्या 'त्यानंतर ...' या कथेत अचूक टिपले आहे. तर मीरा डॉक्टर असून हरिहरसारख्या कफल्लक तरूणच्या प्रेमात पडते. मालुताईचे मोडके हॉस्पिटल चालवायला घेते. हरिहरबरोबर ती लग्न देखील करते. पण

या लग्नाला हरिहर तयार नसतो. प्रवाहाविरुद्ध पोहणाऱ्या, रुढ चौकटीविरुद्ध जाणाऱ्या त्यांच्या कथेतील नायिका आहेत. तर प्रेमासाठी सर्वस्व सोडणाऱ्या करुणाची व्यथा 'दारं उघडावीत ...' या कथेत आली आहे. अरुंधतीसारख्या स्त्रियांना नेहमीच दुसऱ्यांच्या आधाराची कुबडी हवी असते. त्याशिवाय अशी माणसे आयुष्यात स्वत: कधीच उभी राहू शकत नाहीत हे सानियांनी दाखवले आहे.

सानियांच्या कथेतील नायिका समोरचा माणूस अधिक समजून घेण्याचा प्रयत्न करतात. या प्रयत्नात संवादाचे पूल कधी अधिक मजबूत होतात कधी तुटतात तर कधी तगतात. हे असे का होते हे जाणण्याची ओढ त्यांच्यात आहे. त्यांच्या कथेतील नायिका उच्चशिक्षित व नोकरी करणाऱ्या आहेत. त्याचप्रमाणे त्यांचा प्रेमविवाहाकडे असणारा कल आपल्याला दिसून येतो. त्यांच्या चारही कथेत मुंबईच्या अजब झगमगत्या दुनियेचे चित्रण आलेले आहे. त्यांच्या नायिकांना एकटेपणाची अनुभूती नेहमी सतावत असते. सानियांनी विवाहबाह्य संबंधाबद्दल न संकोचता, बिनदिक्कतपणे कथांमध्ये प्रसंगांची मांडणी केली आहे.

सानिया या स्त्रीकथाकार आहेत. त्यांच्या कथासंग्रहाची शीर्षके यथोचित आणि सार्थ अशीच आहेत. सानियांनी चितारलेल्या व्यक्तिरेखा इतक्या सरस उतरल्या आहेत की त्या डोळयांपुढेच उभ्या राहतात. त्याचप्रमाणे क्वचित प्रसंगी म्हणी व वाक्प्रचारांची पेरणी त्यांनी ठिकठिकाणी केलेली आहे. त्यांच्या कथेमध्ये विनोदाला फार वाव नाही. व्यक्ती वर्णनाबरोबर ती व्यक्ती ज्या घरात राहते त्या व्यक्तींची वर्णने, त्याचप्रमाणे निसर्गाची वर्णने त्यांनी सरस चित्रित केलेली आहेत. त्यांना सर्वच ॠतूंचे आकर्षन भुलवते ते त्यांनी आपल्या लेखनात उतरवले आहे. त्यामुळे वातावरणनिर्मितीला चांगला वाव मिळालेला दिसून येतो. इंग्रजी शब्दांचा वारेमाप वापर, तर कधी एखाद दुसरा हिंदी, गुजराती शब्द वापरुन कथेची लज्जत आणखी वाढवली आहे. साधे साधे कौटुंबिक प्रसंग त्यांनी आपल्या शब्दांनी खुलवले आहेत.

स्वत:चे अस्तित्व जपणाऱ्या, स्वत:च्या जीवनाची जाण असणाऱ्या, बुद्धीला व मनाला पटेल तेच करणाऱ्या सानियांच्या कथेतील स्त्रिया आहेत. त्यांचे मनाशी चालणारे

संवाद खूप महत्वाचे ठरतात. शेवटच्या दशकातील स्त्रीकथाकारांमध्ये आपल्या लेखनाचा विशेष ठसा सानियांनी उमटवलेला आहे.

सानिया यांच्या 'दिशा घराच्या कथासंग्रहाचा परिचय व विशेष' या तिसऱ्या प्रकरणामध्ये त्यांच्या कथांचा थोडक्यात सारांश व विशेष नोंदवले आहेत.

'सानिया यांच्या कथांचे स्वरुप व वाड्.मयीन विशेष' या प्रकरणाचा निष्कर्ष काढताना असे जाणवते की स्त्रीला स्त्री म्हणून, एक माणूस म्हणून किंमत द्यायला हवी असा त्यांच्या कथांचा सूर असतो. परंपरेनुसार जो तिचा एक आयुष्यभर कोंडमारा चालू असतो त्या सर्वांना झुगारुन देणाऱ्या सानियांच्या कथा आहेत. त्यांच्या सर्वच कथांमधून जाणवलेले स्त्रीचे रुप हे बंडखोर स्वरुपाचे आहे. त्याच्या कथेत रंगहीन, कलाहीन माणसे चटकन भेटत नाहीत. तीव्र भावभावना असलेल्या व्यक्ती आमने सामने आल्या की त्यांच्यात विलक्षण ताणतणाव निर्माण होतो. हे त्यांनी आपल्या कथेत टिपलेले दिसून येते.

सानियांच्या कथेतून विवाहसंस्थेच्या माध्यमातून कच्ची असलेली स्त्री भेटत नाही. उलट तिचे काही धाडसी निर्णय तिच्या दु:खाला जबाबदार असतात. व्यक्तीगत जीवनावरच त्या जास्त भाष्य करतात. सानियांच्या कथा स्त्री केंद्री असून वाचकाला आत्मशोधन आणि आत्मपरीक्षण करायला लावणाऱ्या आहेत. अनुभव एकच असला तरी या कथा लक्षात राहतात त्या प्रामुख्याने लेखिकेच्या पराकोटीच्या चिंतनशील आणि आत्मनिष्ठ वृत्तीमुळेच. तसेच त्यांच्या कथेतून स्त्रियांच्या समस्या, पुरुषांची चित्रणे, त्यांची वर्णने त्यांची सुख-दु:खे ,भावभावना, इच्छा, आकांक्षा या सर्वांचे चित्रण त्या करतात. छोटया छोटया वाक्यांनी, शब्दांनी संवाद खूपच खुलवतात. तर वातावरणनिर्मितीमुळे कथेला अधिक गडद रंग चढतो. त्याचप्रमाणे भाषाशैलीमध्ये पत्रात्मक शैलीचा एक वेगळाच प्रयोग त्यांनी केलेला आहे. निसर्गवर्णनांची बदलती चित्रणे त्यांनी टिपलेली दिसून येतात. इंग्रजीमिश्रीत मराठीचे नवीन रुप आपल्या प्रत्ययास येते. सानिया या स्वत: उच्च वर्गातील, सुशिक्षित, पुरोगामी वातावरणातील असल्यामुळे त्यांच्या कथेत इंग्रजी भाषेचा वापर जास्तीतजास्त असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे त्यांचा इंग्रजी व मराठी भाषेवर असणारा प्रभाव आपल्याला दिसून येतो.

वरील विवेचनावरुन 'सानिया' यांच्या कथालेखनाचे विशेष 'खिडक्या' आणि 'दिशा घराच्या' या कथासंग्रहाच्या आधारे अभ्यासले आहेत. हा अभ्यास करताना सानिया यांचे व्यक्तिमत्व व साहित्य तसेच सानिया यांच्या 'खिडक्या' कथासंग्रहाचा परिचय व विशेष, सानिया यांच्या 'दिशा घराच्या' कथासंग्रहाचा परिचय व विशेष, सानिया यांच्या कथांचे स्वरुप व वाङ्.मयीन विशेष या प्रकरणांचा अभ्यास केला आहे. त्यामध्ये अभ्यासक म्हणून मला जे काही भावले ते येथे नोंदवले आहे. ते सर्वमान्य होईलच असे नाही. मात्र या ठिकाणी एका निखळ संशोधकाच्या भूमिकेतून सानिया यांच्या 'खिडक्या' आणि 'दिशा घराच्या' या कथासंग्रहाच्या आधारे त्यांच्या कथालेखनाचे विशेष अभ्यासण्याचा मी प्रयत्न केलेला आहे.